पुढारी

# ‘फिनोलेक्स, मुकुल माधव’तर्फे विविध उपक्रम

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि त्यांचे सीएसआर पार्टनर असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशन तर्फे विविध उपक्रम राबवण्यात आले. आशादीप तसेच अनुसया आनंदी महिला वृद्धाश्रमाला देणगी देऊन तसेच वृक्षारोपणाच्या माध्यमातून स्मरण दिन साजरा करण्यात आला.





**रत्नागिरी : १) स्मरण दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी व मान्यवर. २) वृक्षारोपण करताना विद्यार्थी.**

दरवर्षी मुकुल माधव विद्यालयामध्ये २६ जुलै हा दिवस मेमोरियल डे अर्थात स्मरण दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून रत्नागिरीतील मतिमंद मुलांसाठी कार्यरत असणाऱ्या आशादीप संस्थेमध्ये त्यांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या पेडेस्टल फॅन व किचन शेगडी या वस्तू मदत म्हणून प्रदान करण्यात आल्या. दरवर्षी मुकुल माधव विद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत धान्य गोळा करून ‘एक मुठ्ठी अनाज की’ हा अनोखा उपक्रम राबविण्यात येतो. परंतु, कोरोनाच्या महामारीमुळे सध्या शाळा बंद असल्यामुळे मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे ‘आशादीप’ साठी आवश्यक वस्तू फाऊंडेशनतर्फे प्रदान करण्यात आल्या.

याच दिवशी मुकुल माधव विद्यालय व फिनोलेक्स इंडस्ट्रीज परिसरात मुकुल माधव विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पावस येथील अनुसया आनंदी महिला वृद्धाश्रमाला मुकुल माधव विद्यालयाच्या स्थापना दिवसाचे औचित्य साधून जून २०२० पासून मासिक धान्य वाटप देऊन सहकार्य देण्यास सुरुवात करण्यात आली. स्मरण दिनाचे औचित्य साधून वृद्धाश्रमाला किराणा मालाचे यावेळी वाटप करण्यात आले. आश्रमामध्ये ६० ते ९६ या वयोगटातील १३ महिलांना याचा लाभ मिळणार आहे.

कार्यक्रमावेळी, मुकुल माधव विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. प्रशांत होमकर, विद्यार्थी, पालक तसेच, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे पदाधिकारी उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान कोरोना नियमावलीचे तंतोतंत पालन करण्यात आले.

या सर्व उपक्रमाबद्दल आशादीप संस्था, शाळेतील पालक वर्ग व आश्रमातील व्यवस्थापक व महिलांनी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनचे आभार मानले. व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांचे मार्गदर्शन लाभले.